महाराष्ट्र शासन

क्रमांक संकीर्ण २०१२ / प्रक्र. ४४१ / विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०१३

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
कुलसचिव अ) डेक्कन पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
ब) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
क) गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे.

विषय :- विविध कल्याणकारी योजनांच्या संदर्भात लाभार्थीच्या बँक खात्यात थेट रोख रक्कम हस्तांतरीत करण्याबाबत.

महोदय,

केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्या संदर्भात केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र / राज्य शासनाकडून देण्यात येणारे अनुदान / निधी आता आधार क्रमांकाशी ( UID ) संलग्न बँक खात्यामार्फत लाभार्थ्यांना थेट द्यावयाचे आहेत.

२. विद्यापीठांकडून शासनाच्या विविध योजनांतर्गत विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ देण्यात येतात. सदर लाभ आधार ( UID ) क्रमांकाशी संलग्न बँक खात्यामार्फत लाभार्थ्यांना थेट देणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठांकडून शासनाच्या ज्या विविध योजनान्वये आर्थिक लाभ देण्यात येतात ते सर्व लाभ आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्यामार्फत लाभार्थ्यांना थेट देण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खाती सुरु केलेली नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे आधार कार्ड काढून घेण्याच्या सूचना देण्यात देऊन त्याचे आधारावर संलग्न बँक खाते सुरु करण्याचे अनिवार्य करण्यात यावे.

३. उपरोक्त प्रकरणी मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, युआयडीएआय यांच्यात वेळोवेळी होणाऱ्या बैठकीत आढावा घेण्यात येणार असल्याने आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना न चुकता पाठवावा अशी विनंती आहे.

आपला,

( प्रमोद गि. कानडे )